
# आर्थिक समावेशन

| आर्थिक समावेशन म्हणजे काय ? |
| --- |
| • देशातील वंचित व अल्प उत्पन्न गटातील जनतेला कमी खर्चात बँकिग सेवा उपलब्ध करून देणे. |

| आर्थिक समावेशनची आवश्यकता का आहे ? |
| --- |
| • ग्रामीण भागामध्ये बँकेची भूमिका सक्रीय करणे<br>• आर्थिक साक्षरता व शिक्षण प्रदान करणे<br>• बँकेच्या सेवाकरिताचा जास्तीचा खर्च व वेळ कमी करणे<br>• शाश्वत उपजीविका प्रदान करणे |

प्रथम डोसचे बँक कर्ज

स्वयंसहाय्यता समूह  स्थापना




समुदाय गुंतवणूक निधी वितरीत


समूहाचे बँक खाते

फिरता निधी वितरीत करणे

# आर्थिक समावेशनचे महत्वाचे घटक





# बँक पतपुरवठा

रक्कम कोटीमध्ये

| बँक पतपुरवठा | उद्दिष्ट | | साध्य | | % | | Loan Ticket Size |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | समूह | रक्कम | समूह | रक्कम | समूह | रक्कम | |
| सन 2023-24 | 3,10,500 | 6,380 | 2,84,893 | 8,950 | 91.75 | 140 | 3.14 |
| सन 2024-25 | 3,10,500 | 6,380 | 2,44,19 | 9,157 | 79 | 144 | 3.74 |

- बँक पतपुरवठ्याचे उद्धिष्ट जिल्हा व बँक निहाय वितरीत करण्यात येते
- बँक पतपुरवठा उद्धिष्टाकरिता दरतिमाहीला बँक अधिकारी यांची बैठक घेतली जाते.
- स्वयं सहाय्यता समूहाच्या बँक पतपुरवठ्याकरिता १३ बँका सोबत MoU करण्यात आला आहे.
- 85212 स्वयं सहायता समूहाचा NIC कोड अद्यावत नसल्याने सदर प्रगती दिसून येत नाही.
- राष्ट्रीयकृत व खाजगी बँकेकडून मोठ्या प्रमाणात बँक पतपुरवठा होत आहे.
- जिल्हा मध्यवर्ती सहकारी व महाराष्ट्र ग्रामीण बँकेची  बँक पतपुरवठा प्रगती कमी आहे.

# RBI Circular - 20th July 2022

रिजर्व बँक ऑफ इंडिया यांनी Day NRLM करिता दि. २० जुलै २०२२ रोजी स्वतंत्र मार्गदर्शिका दिली आहे.

- **कर्ज रक्कम -**

| पूर्वीची कर्ज रक्कम | सुधारित कर्ज रक्कम |
|---|---|
| प्रथम डोस - बचतीच्या ६ पट अथवा किमान १ लक्ष यापैकी जे अधिक असेल ती रक्कम | किमान १.५ लक्ष |
| प्रथम डोस -बचतीच्या ८ पट अथवा किमान २ लक्ष यापैकी जे अधिक असेल ती रक्कम | किमान ३ लक्ष |


- **व्याज दर -**

| कर्ज रक्कम | व्याज दर |
|---|---|
| ३ लक्षापर्यंत | ७% |
| ३ ते ५ लक्ष | १ वर्षाच्या MCLR नुसार अथवा कमाल १०% यापेक्षा जे कमी असेल ते |

## समुदाय स्तरीय वसुली यंत्रणा (CBRM)

- प्रामुख्याने २% पेक्षा अधिक NPA असणाऱ्या प्रत्येक बँक शाखेमध्ये CBRM समिती स्थापित करण्यात येत आहे.
- CBRM समिती मध्ये बँक व्यवस्थापक, BMFI, CC, बँक सखी व ग्रामसंघातील २ ते ३ सदस्यांचा समावेश असतो
- CBRM समितीचे प्रमुख कार्य खालील विषयसूचीनुसार दरमहा बैठक घेणे
  - ➢ महिन्यातील कर्ज वितरण, परतफेड व थकीत कर्ज
  - ➢ थकीत कर्ज वसुली नियोजन
  - ➢ बैठक इतिवृत्त

# CBRM-समुदाय स्तरीय वसुली यंत्रणा



# आर्थिक साक्षरता

- स्वयं सहाय्यता समूहातील सदस्यांना बचत, गुंतवणूक कुठे करायची, कर्ज कुठून काढायचे, कर्ज परतफेड व विमा योजना याबाबत FLCRP द्वारे खालील विषयावर आर्थिक साक्षरतेचे प्रशिक्षण देण्यात येते.

१. आर्थिक नियोजन - एकूण उत्पन्न - खर्च = बचत

२. समंजस खर्च

३. स्मार्ट सुरेख बचत

४. सुज्ञ कर्ज

५. विमा संरक्षण व निवृत्ती वेतन

- सक्षम केंद्र - प्रभागसंघ स्तरावर सक्षम केद्र स्थापित करून सदस्यांना आर्थिक साक्षरतेविषयी मार्गदर्शन करणे





# समुदाय निधी

- **फिरता निधी (RF) - स्वयं सहाय्यता समूहातील सदस्यांना अंतर्गत कर्ज व्यवहाराला अर्थसहाय्य म्हणून समूह स्थापना होऊन ३ महिने पूर्ण झाल्यानंतर फिरता निधी वितरीत करण्यात येतो.**

  1. रु. १५,००० NRLM निधी

  2. रु. १५,००० राज्य शासन

- **समुदाय गुंतवणूक निधी (CIF) - स्वयं सहाय्यता समूहांना उपजीविका विकासाकरिता समूह स्थापना होऊन ६ महिने पूर्ण झाल्यानंतर रु. ६०,००० समुदाय गुंतवणूक निधी वितरीत करण्यात येतो.**

# मिशन -- एक ग्रामपंचायत“  एक BC सखी”

ग्रामीण व दुर्बल भागातील जनतेच्या दाराशी बँकेच्या सुविधा पोहचविण्याकरिता BC सखी (Business Correspondence) कार्यरत करण्यात येतात. BC सखी द्वारे स्वयंसहाय्यता समूह, ग्रामसंघ व प्रभागसंघ यांचे रोख विरहित (Digital Transaction) आर्थिक व्यवहार बँकेच्या माध्यमातून करण्यात येतात.



**BC सखी मार्फत ग्रामीण भागामध्ये देण्यात येणाऱ्या  सेवा**

- वैयक्तिक व स्वयंसहाय्यता समूह यांचे बँक खाते उघडणे
- बँक खात्यावर रक्कम जमा करणे अथवा रक्कम  काढणे
- पात्र सदस्यांना विमा व पेन्शन योजनेमध्ये समाविष्ट करून घेणे
- विविध प्रकारचे बिल भरणा करणे
- **BC सखी यांची निवड बँक व कार्पोरेट BC यांच्या माध्यमातून होते.**
- **BC सखी यांनी केलेल्या आर्थिक व्यवहारावर बँकेकडून त्यांना कमिशन स्वरुपात आर्थिक उत्पन्न प्राप्त होते.**

# वैयक्तिक उद्योग व्यवसाय कर्ज योजना

**१. मुद्रा कर्ज - देशातील लघु उद्योगांना कर्ज पुरवठा प्राप्त व्हावा याकरिता मुद्रा कर्ज योजना सुरु करण्यात आली आहे.**


मुद्रा योजनेतील कर्जाचे प्रकार-

- **शिशू : रु. ५०,०००**
- **किशोर : रु. ५०,००० ते रु. ५ लक्ष**
- **तरुण श्रेणी : रु. ५ लक्ष ते २० लक्ष**


**योजनेचे फायदे -**

- वार्षिक ९ टक्के दराने २० लाख रुपयांपर्यंत अर्थपुरवठा
- कोणत्याही प्रकारचा जामीन नाही.
- कोणत्याही प्रकारचे मोर्गेज आवश्यक नाही
- हि योजना फक्त सरकारी बँकेतच होणार.
- अर्जदार कोणत्याही बँकेचा थकबाकीदार नसावा.


# बँक निहाय वैयक्तिक उद्योग व्यवसाय कर्ज योजना



# बँक निहाय वैयक्तिक उद्योग व्यवसाय कर्ज योजना



सामाजिक सुरक्षा योजना



# प्रधानमंत्री जीवनज्योती बिमा योजना (PMJJBY)

- पात्रता : वय १८ ते ५० वर्ष
- विमा कालावधी : एक वर्ष
- विमा रक्कम : रु. ४३६/- प्रती वर्ष
- विमा रक्कम भरण्याची पद्धत : बँकेद्वारे ग्राहकाच्या बचत बँक खात्यातून थेट स्वयं भरणा.
- विमा संरक्षण : नैसर्गिकरित्या मृत्यु झाल्यास नामांकित व्यक्तीला रु.२ लाख

# प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना (PMSBY)

- पात्रता : वय १८ ते ७० वर्ष
- विमा कालावधी : एक वर्ष
- विमा रक्कम : रु. २०/- प्रती वर्ष
- विमा रक्कम भरण्याची पद्धत : बँकेद्वारे ग्राहकाच्या बचत बँक खात्यातून थेट स्वयं भरणा.
- विमा संरक्षण : अपघाती मृत्यू झाल्यास अथवा पूर्णतः Disability आल्यास रुपये २ लाख. तर Partial Disability आल्यास रुपये १ लाखाचे विमा संरक्षण प्राप्त होते.


# अटल पेन्शन योजना (APY)




- योजनेचा लाभ : प्रतिमाह ग्राहकांसाठी रुपये १,००० ते ५,००० पेन्शन
- पात्रता : वय १८ ते ४० वर्ष
- योगदान : रु. ४२ ते १,४५४ नोंदणीच्या वेळी असलेले वय व ग्राहकाला आवश्यक असलेली मासिक पेन्शन यावर अवलंबून आहे.

  योगदानाचा किमान कालावधी २० वर्ष व त्यापेक्षा जास्त राहील.
- पॉलीसीचा प्रीमिअम भरण्याची पद्धत : बँकेद्वारे ग्राहकाच्या बचत बँक खात्यातून थेट स्वयं भरणा.
- पेन्शन प्राप्ती : ग्राहकाला ६० वर्ष पूर्ण झाल्यावर अथवा ग्राहकाचा मृत्यू झाल्यास पती किंवा पत्नीला होईल.

# आर्थिक समावेशन समुदाय संसाधन व्यक्ती (CRP)



**बँक सखी**

**२,३२९**

**(स्वयंसहाय्यता समूह व बँक यांच्यामध्ये दवा म्हणून कार्य करते)**

**डिजी पे सखी**

**३,९००**

**BC सखी ७,२३०**

**(ग्रामीण व दुर्बल भागातील लोकांच्या दाराशी बँकेच्या सेवा पोहोचविणे )**

**आर्थिक साक्षरता सखी**

**१,५२२**

**(स्वयंसहाय्यता समूहातील सदस्यांना आर्थिक साक्षरतेचे प्रशिक्षण देणे)**

# SHG Bank Linkage Portal

https://banklinkage.lokos.in/

